## प्रसिद्धीपत्रक

# मतदार यादीत आपले नाव तपासणे

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी दि. २ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) ते १६ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) हा कालावधी निश्चित केला गेला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी देखील उपलब्ध आहे. यांपैकी एक महत्वाची बाब म्हणजे मतदारांनी मतदार यादीत आपले नाव आहे की नाही हे तपासणे.

**मतदान यादीत नाव तपासणे का गरजेचे आहे :**

- अनेकदा असं दिसतं की नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहचल्यावर मतदार यादीत आपले नाव शोधतात. अशावेळी त्यांचे नाव मतदान यादीत आढळले नाही की, ते मताधिकाराला मुकतात.
- बऱ्याचदा मतदार त्यांनी आधीच्या निवडणुकीत ज्या मतदान केंद्रावर मत दिले होते, तिथेच आपले नाव असेल असे गृहीत धरून त्याच मतदान केंद्रावर जातात. मात्र मतदार केंद्रांच्या पुनर्रचनेत त्यांचे नाव दुसऱ्या मतदान केंद्रावर गेलेले असू शकते. या माहितीच्या अभावामुळेही मतदार यादीत आपले नाव नाही असे समजून ते मतदानाला मुकतात.

- मतदार ओळखपत्रात नाव, लिंग, जन्मतारीख, मोबाइल क्रमांक इ. वैयक्तिक तपशिलांत चुका असतील तर, मतदाराला असं ओळखपत्र एखाद्या ठिकाणी पुरावा म्हणून देण्यास अडचण येऊ शकते, म्हणून त्यांनी हे बदल करून घेतले पाहिजेत. दुसरं म्हत्त्वाचं म्हणजे मतदानाच्या वेळीही ओळख पटवण्यासाठी ते अडचणीचं ठरू शकतं त्यामुळेही हे बदल करून घेणे आवश्यक असतं.

या सगळ्यासाठी आपण वेळोवेळी मतदार यादीत आपलं नाव तपासले पाहीजे. जेणेकरून मतदार यादीत आपले नाव नसेल तर आपण मतदार नोंदणीचा अर्ज भरू शकतो, तसेच आपल्या वैयक्तिक तपशिलात - पत्त्यात बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करायची गरज असेल तर त्यासाठीचे अर्जही वेळेत भरू शकतो. यामुळे आपण ऐन मतदानाच्या दिवशी होणारा गोंधळ आणि विलंब टाळू शकतो. येतो.

**मतदान यादीत नाव कसे तपासावे:**

ऑनलाईन पद्धतीने आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने आपल्याला मतदार यादीत आपले नाव शोधता येते.

- ऑनलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव तपासण्यासाठी दोन पर्याय आहेत एक electoralsearch.eci.gov.in हे संकेतस्थळ आणि दुसरा Voter Helpline App
- आपल्याला, आपले वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्र क्रमांक, मतदार ओळखपत्रासोबत जोडलेला युनिक मोबाइल नंबर, मतदार ओळखपत्रावरील बारकोड किंवा क्युआर कोड या माहितीच्या आधारेमतदार यादीत आपलं नाव शोधता येतं.

- Voter Helpline Appच्या होम पेजवरील Search Your Name In Electoral Roll हा पर्याय निवडला की,वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्रावरील बारकोड किंवा क्युआर कोड आणि मतदार ओळखपत्र क्रमांक या माहितीच्या आधारेमतदार यादीत आपलं नाव शोधण्याचे पर्याय दिसतात.
- electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळावर वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्र क्रमांक आणि मतदार यादीतील आपल्या नावासोबत जोडलेला युनिक मोबाइल नंबर या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपलं नाव शोधण्याचे पर्याय दिसतात.
- आपण एसएमएसद्वारे देखील मतदार यादीत आपले नाव तपासू शकतो. त्यासाठी आपल्या आपल्या मोबाइलवरून 'ECI <स्पेस> <मतदान ओळखपत्र क्र.> हा मेसेज 1950 या क्रमांकावर पाठवावा लागतो.
- राज्याच्या मुख्य निवडणुक अधिकारी कार्यालयाच्या ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही पीडीएफ स्वरुपातील मतदार यादी उपलब्ध असते. आपल्या मतदारसंघातील यादी भागानुसार ही मतदारयादी डाऊनलोड करून आपण त्यात आपले नाव तपासू शकता.
- यासोबतच आपण जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन, तिथे उपलब्ध असलेल्या मतदारयादीच्या प्रतीतही आपण आपले नाव तपासू शकतो.

तेव्हा, त्वरित आपले नाव तपासा आणि आपला मताधिकार सुनिश्चित करा.

प्रसिद्धीपत्रक

# मतदार यादीतील आपल्या नावासोबत स्वतःचा मोबाईल क्र. जोडून घ्या.

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी दि. २ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) ते १६ ऑगस्ट २०२४ (शुक्रवार) हा कालावधी निश्चित केला गेला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नव मतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी देखील उपलब्ध आहे. यांपैकी एक महत्वाची बाब म्हणजे मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावासोबत स्वतःचा मोबाईल क्र. जोडून घेणे.

**मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडण्याचे फायदे.**

- निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी विविध सूचना आणि माहिती पाठविली जाते. त्यामध्ये मतदान केंद्र, मतदानाची तारीख, मतदानाची वेळ इत्यादी महत्वाची माहिती समाविष्ट असते. मतदानाच्या दिवशी आपला वेळ वाचवण्यासोबतच, विनासायास मताधिकार बजावण्यास ही माहिती कामी येते.
- भारत निवडणूक आयोगाकडून मतदारांसाठी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना आणि निर्देशांची माहिती प्राप्त होते
- भारत निवडणूक आयोगाच्या वतीने राबवले जाणारे मतदार सर्वेक्षणासारखे उपक्रम, मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्या संदर्भातील अर्जावरील कार्यवाही याबाबतच्या सूचना – नोटीसा, पंचनाम्याची सूचना (असेल तर) प्राप्त होते, आणि संभाव्य कार्यवाही सुलभ होते
- आपला मोबाईल क्रमांक अद्ययावत केल्यास, भारत निवडणूक आयोगाच्या electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळाद्वारे तसेच Voter Helpline ॲपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा सुलभतेने शोध घेता येता.
- इ - मतदार ओळखपत्र डाऊनलोड करता येते

**महत्वाचे**

पूर्वी मतदार नोंदणीसह मतदारांशी संबंधित इतर सेवांची प्रक्रिया प्रामुख्याने ऑफलाइन पद्धतीनेच चालत असे, तसेच देशात मोबाईलचा वापर सुरू झाल्याच्या सुरुवातीच्या काळात मोबाईल

वापरकर्त्यांची संख्याच अत्यंत नगण्य होती. त्यामुळेच याआधी नोंदणी झालेल्या बहुतांश मतदार ओळखपत्रधारकांचे मोबाईल क्र. त्यांच्या नावासोबत जोडलेले नाहीत.

यासोबतच ऑनलाईन पद्धतीत एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून एका पेक्षा अधिक जणांचे मतदार नोंदणी अर्ज भरले जातात. अशावेळी सदर मोबाईल क्र. हा विशिष्ट मतदारापुरताच मर्यादीत नसल्याने. तो कोणाही मतदाराच्या नावासोबत त्याचा विशिष्ट म्हणजेच युनिक मोबाईल क्र. म्हणून जोडला जात नाही. हे टाळण्यासाठी एका मोबाइल क्रमांकाचा वापर फक्त एकाच मतदार ओळखपत्रासाठी केला जावा.

त्यामुळे विद्यमान मतदारांसह ज्यांच्या मतदार यादीतील नावासोबत त्यांचा विशिष्ट अर्थात युनिक मोबाईल क्रमांक जोडलेला नाही. त्यांनी अर्ज क्र. ८ भरून आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडून घेणे मतदारांच्या हिताचे आहे.

**मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडण्यासाठीचे पर्याय**

**१) नव मतदार नोंदणीचा अर्ज भरताना**

नव मतदार नोंदणीचा अर्ज भरताना आपल्याला अर्जात स्वतःचा मोबाईल क्र. देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्याचवेळी आपण इतर कोणत्याही मतदार ओळखपत्रासाठी वापरला न गेलेला असा स्वतःचा मोबाईल क्र. दिला तर तो मतदार यादीत आपल्या नावासोबत जोडला जातो.

**२) विद्यमान नोंदणीकृत मतदारांसाठी अर्ज क्र. ८**

भारत निवडणूक आयोगाच्या मतदारांकरता असलेल्या अर्ज क्र. ८ मध्ये मतदार यादीतील वैयक्तिक तपशीलांमधील बदल, दुरुस्त्या आणि अद्ययावतीकरणाअंतर्गत मतदार यादीत आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडण्याचा पर्याय दिला आहे.

हा अर्ज ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने भरता येतो.

ऑनलाईन अर्ज भरण्याकरता www.voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline हे मोबाईल ॲप वापरता येते. या व्यासपीठांवर लॉगीन केल्यावर अर्ज क्र. ८ निवडून, त्यात 'Correction of Entries in Electoral Roll' या सुविधेअंतर्गत, आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडण्याचा पर्याय मिळतो.

ऑफलाईन अर्ज भरण्यासाठी मतदार जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयालात जाऊन, तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमादरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष शिबिरांमध्येही ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरू शकतील.

**३) आपण आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकता आणि त्यांनाही मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्र. जोडून देण्याची विनंती करू शकता.**